तरुण भारत संवाद
शुक्रवार, ७ फेब्रुवारी २०२५

# प्रतिक मिस्टर विवेकानंद, शरयू मिस विवेकानंद

## विवेकानंद शिक्षण संस्थेचे कार्यकारी अध्यक्ष प्राचार्य अभयकुमार साळुंखे यांच्याकडून अभिनंदन

प्रतिनिधी
कोल्हापूर

स्पर्धेच्या युगात विद्यार्थ्यांच्या कलागुणांना वाव देणे गरजेचे आहे. सध्याचा काळ कौशल्य विकासाचा असून अशा काळात विद्यार्थ्यांनी आपल्या व्यक्तिमत्वाला आकार देण्यासाठी विविध स्पर्धेमध्ये सहभागी होणे महत्त्वाचे आहे. विवेकानंद कॉलेजने विद्यार्थ्यांच्या कर्तृत्वाला आकार देण्यासाठी, त्याच्या कलागुणांचा विकास होण्यासाठी विवेकानंद महोत्सव : शोध चैतन्याचा २०२५ चे केलेले आयोजन महत्वपूर्ण आहे. या स्पर्धेत प्रतिक चौगुले मिस्टर विवेकानंद तर शरयू सुतार मीस विवेकानंद झाली आहेत, ही कौतुकास्तप गोष्ट असल्याचे मत संस्थेचे कार्याध्यक्ष प्राचार्य अभयकुमार साळुंखे यांनी व्यक्त केले.



**कोल्हापूर : विवेकानंद कॉलेजमधील मिस्टर विवेकानंद प्रतिक चौगुले व मिस विवेकानंद शरयू सुतार यांच्याबरोबर प्राचार्य डॉ. आर. आर. कुंभार, आदी.**

विवेकानंद कॉलेजतर्फे आयोजित विवेकानंद महोत्सव : शोध चैतन्याचा २०२५ च्या सांगता समारंभात ते बोलत होते. प्राचार्य डॉ.कुंभार यांच्या मार्गदर्शनाखाली केले होते.

प्रास्ताविक विवेकानंद महोत्सवाच्या समन्वयक डॉ. श्रुती जोशी यांनी केले. विद्यार्थ्यांनी तयार केलेल्या वस्तू व खाद्यपदार्थांच्या स्टॉलवरही भरपूर गर्दी होती. महोत्सवाच्या पहिल्या दिवशी अभिवाचन, नाविन्यपूर्ण संशोधन, ऍड मॅड शो, रिल फ्लिक्स, डान्स मॅजिक या स्पर्धांचे तर दुसऱ्या दिवशी फन फेअर आणि मिस्टर अँण्ड मिस विवेकानंद स्पर्धांचे आयोजन करण्यात आले. फन फेअरचे उदघाटन संस्थेचे मुख्य कार्यकारी अधिकारी कौस्तुभ गावडे, सिनेअभिनेत्री ज्योत्स्नाराजे गायकवाड तर मिस्टर अँण्ड मिस विवेकानंद स्पर्धेसाठी संस्थेच्या सेक्रेटरी प्राचार्या शुभांगी गावडे, रोहित कारगावे यांची प्रमुख उपस्थिती होती.

या स्पर्धेतील अभिवाचन स्पर्धेसाठी डॉ. रमेश साळुंखे, प्रा. श्रीराम मोहिते, ॲडड मॅड शोसाठी एम. एम. शिंदे व मिताली गाठे यांनी, आयडियाथॉन साठी डॉ.संतोष मस्के व आदित्य सुर्वे, डान्स मॅजिंक साठी विकास पोवार व गणेश इंडीकर, मिस्टर व मिस विवेकानंद साठी तिल्लोतमा देशमुख व शितल पाटील, रिल फ्लिक्ससाठी विष्णू वजार्डे यांनी परीक्षक म्हणून काम पाहिले. या स्पर्धांमध्ये कोल्हापूर, सातारा, सांगली, पुणे, सोलापूर, मुंबई येथील अनेक महाविद्यालये सहभागी झाली होती. वरील स्पर्धेतील सर्व विजेत्यांना मान्यवरांच्या हस्ते रोख रक्कम व प्रमाणपत्रे देऊन गौरविण्यात आले.

07/02/2025

7.2.25